99

**महाराष्ट्र शासन**

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.

विषय : मद्य साठयावर पुन:प्रक्रिया/ पुन:लेबलिंग व पुन:उर्ध्वपतन करण्याबाबत.

## परिपत्रक

*****

क्रमांक : एफएलआर ११२०१५/३२००/५ (ब) मुंबई दि. १७ जुलै, २०१५.

महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मधील नियम १५ मधील तरतूदींनुसार विदेशी मद्य निर्मितीसाठी नमुना "पीएलएल" अनुज्ञप्ती प्रदान करण्यात येते. त्यानुसार राज्यातील विदेशी मद्य घटक त्यांचे विदेशी मद्य निर्माणीत विविध ब्रॅण्डचे उत्पादन करतात परंतु काही वेळा उत्पादीत केलेल्या ब्रॅण्डसना राज्यात/परराज्यात/परदेशात मागणी नसल्याने विक्री अभावी मद्यसाठा घटकाच्या बंधित वखारीत पडून राहतो. काही वेळा मद्याच्या रंगात फरक होतो किंवा बाजारात विक्री झाल्यानंतर मद्याची गुणवत्ता चांगल्या प्रकारची नाही असे निदर्शनास आल्यास ग्राहकास विक्री करता येत नाही. त्यामुळे मद्य उत्पादकास सदर साठा विक्री न करता परत आणावा लागतो किंवा वितरीत करता येत नाही. तसेच मद्य वितरीत करताना वाहनास अपघात झाल्याने मद्याच्या बाटल्यांवरील लेबल्स व बुचे खराब होतात अशा प्रकरणी मद्य उत्पादक मद्यसाठयावर पुन:प्रक्रिया/ पुन:लेबलिंग/पुन:उर्वपतन करण्यास परवानगी मिळण्याबाबत विनंती करतात. याबाबत प्रचलीत नियमात तरतूद नाही.

उपरोक्तनुसार सध्या आयुक्त स्तरावर त्यांचे अधिकारात कार्यवाही करण्यात येत असली तरी प्रभारी अधिकाऱ्यांनी अधीक्षकांना व अधीक्षकांनी आयुक्तांना प्रकरण सादर करणे व तद्नंतर आयुक्तांची मान्यता घेणे या प्रक्रियेत विलंब होत असल्याने प्रकरणांचा जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

17/07/2015

- विदेशी मद्याचा साठा निर्माणीच्या बंधित वखारीत असेल तर अशा मद्य साठयावर पुन:प्रक्रिया /पुन:लेबलिंग/ पुन:उर्ध्वपतन त्याच ठिकाणी करावयाचे असल्यास असे करण्याची परवानगी संबंधित जिल्हा अधीक्षकांच्या स्तरावर देण्यात यावी.
- मद्य उत्पादक घटकाकडे आसवनी नसेल तर अन्य आसवनीमार्फत पुन:उर्ध्वपतन करण्यास परवानगी देण्याचे अधिकार संबंधित विभागीय उप-आयुक्त, रा.उ.शु. यांना देण्यात येत आहेत.
- काही प्रकरणात एफएल-१ घटकाकडे वितरीत केलेल्या मद्याच्या गुणवत्तेत किंवा रंगात फरक झाला असेल तर पुन:उर्ध्वपतन करण्यास ज्या जिल्हयात मद्य निर्माणी कार्यरत आहे त्या विभागाच्या विभागीय उप-आयुक्त रा.उ.शु. यांनी परवानगी दयावी.

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक 883
दिनांक 7/8/15
विभाग

उपरोक्तनुसार कार्यवाही करताना संबंधित जिल्हा अधीक्षकांनी तसेच विभागीय उप-आयुक्तांनी घटकांनी केलेल्या विनंती अर्जाची सत्यता पडताळून उक्त नमूद केल्यानुसार खालील अटीं नमूद करुन परवानगी देण्याची कार्यवाही करावी.

**पुन:प्रक्रिया अटी**

- घटकाने सादर केलेल्या पत्रातील नमुद केलेल्या ब्रॅण्डचे पुन:प्रक्रिया करुन रुपांतर करावे लागेल. पुन:प्रक्रिया करताना येणाऱ्या हानीवर प्रचलित दराने उत्पादन शुल्क भरावे लागेल तसेच उत्पादन शुल्क न भरल्यास मद्य विक्री बंद केली तरी त्यांचे आक्षेप राहणार नाही, अशा प्रकारचे हमीपत्र प्रभारी अधिकारी यांचेकडे सादर करावे.
- पुन:प्रक्रिया चालू असताना त्याच बॉटलिंग लाईनवर इतर मद्याची निर्मिती करता येणार नाही.
- पुन:प्रक्रिया केलेल्या मद्यावर चालू बॅच क्रमांक व निर्मिती महिना छापणे आवश्यक आहे.
- पुन:प्रक्रियेची कार्यवाही प्रभारी अधिकारी यांचे पर्यवेक्षणाखाली करण्यात यावी.
- पुन:प्रक्रिया सदर पत्र प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आंत करण्यात यावी. सदर मुदतीत कार्यवाही पूर्ण न झाल्यास पुन्हा मुदतवाढ देण्याची विनंती मान्य करता येणार नाही.
- घटकाच्या बंधित वखारीतील मद्यावर पुन:प्रक्रिया केल्यानंतर निर्मित करण्यात येणाऱ्या नवीन ब्रॅण्ड वरील उत्पादन शुल्क प्रचलित दराने भरावे लागेल.
- एफएल-१ मधून मद्यसाठा निर्माणीत आणावयाचा झाल्यास त्यावर विहीत दराने वाहतुक शुल्क भरावे लागेल.

**पुन:उर्ध्वपतन अटी**

- पुन:उर्ध्वपतन करताना येणाऱ्या हानीवर प्रचलित दराने उत्पादन शुल्क भरावे लागेल.
- पुन:उर्ध्वपतन कार्यवाही प्रभारी अधिकारी यांचे पर्यवेक्षणाखाली करण्यात यावी.
- पुन:उर्ध्वपतन सदर पत्र प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आंत करण्यात यावी. सदर मुदतीत कार्यवाही पूर्ण न झाल्यास पुन्हा मुदतवाढ देण्याची विनंती मान्य करता येणार नाही.
- पुन:उर्ध्वपतन केलेल्या मद्याचा हिशेब वेगळा ठेवावा.
- एफएल-१ मधून मद्यसाठा निर्माणीत आणावयाचा झाल्यास त्यावर विहीत दराने वाहतुक शुल्क भरावे लागेल.

**रिलेबलिंग अटी**

- जुनी लेबल्स काढणे व नवीन लेबल्स लावणे ही प्रक्रिया प्रभारी अधिकारी यांचे समक्ष करणेत यावी.
- वरील प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या हानीवर प्रचलित दराने उत्पादन शुल्क भरावे लागेल.
- एफएल-१ मधून मद्यसाठा निर्माणीत आणावयाचा झाल्यास त्यावर विहीत दराने वाहतुक शुल्क भरावे लागेल.

महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मधील नियम २४ नुसार आयुक्तांना असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त मार्गदर्शक सूचना प्रस्तृत करण्यात येत आहेत.

सदरच्या परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(राजेश कुमार)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
३. या कार्यालयातील राजपत्रित अधिकारी.
४. सर्व "पीएलएल" अनुज्ञप्तीधारक.
५. सर्व पीएलएल घटकांवरील प्रभारी अधिकारी.
६. अभिलेख शाखा ५ प्रती.